# BDC LIBRARY
## New Paper Clipping
## A.Y. 2023-2024



संचालक संजीव चव्हाण व प्राचार्य एस. डी. पवार यांचा सत्कार करताना पाटण तालुका पत्रकार संघाचे पदाधिकारी.

# बाळासाहेब देसाई महाविद्यालयाचा पाटण पत्रकार संघाकडून सत्कार

▲ पाटण, दि. २६ : पाटणसारख्या दुर्गम, डोंगराळ तालुक्याच्या डोंगरदऱ्यात शिक्षणाची गंगा निर्माण करणाऱ्या कोयना एज्युकेशन सोसायटीच्या तालुक्यातील एकमेव बाळासाहेब देसाई महाविद्यालयाने खडतर परिस्थितीला सामोरे जात शैक्षणिक क्षेत्रात केलेले कार्य अलौकिक आहे. नॅकसारख्या राष्ट्रीय पातळीवरील संस्थेचे मिळालेले ए प्लस मानांकन तालुक्यासाठी भूषणावह असून यानिमित्ताने महाविद्यालयासह तालुक्याचे नाव देशपातळीवर चमकले असल्याचे प्रतिपादन पाटण तालुका पत्रकार संघाचे माजी अध्यक्ष राजेंद्र पवार यांनी केले.

कोयना एज्युकेशन सोसायटीच्या येथील बाळासाहेब देसाई महाविद्यालयास बंगलोर येथील राष्ट्रीय पातळीवर नॅकसारख्या उच्चस्तरीय समितीकडून ए प्लस मानांकन प्राप्त झाल्याबद्दल येथील संस्था कार्यालयात आयोजित सत्कारप्रसंगी ते बोलत होते. यावेळी कोयना एज्युकेशन सोसायटीचे संचालक संजीव चव्हाण, प्राचार्य डॉ. एस. डी पवार यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी संचालक संजीव चव्हाण, प्राचार्य डॉ. शिरीष पवार यांचे तसेच नॅक समन्वयक प्राध्यापक यांचे पाटण तालुका पत्रकार संघाच्यावतीने अभिनंदन करण्यात आले. यावेळी पाटण तालुका पत्रकार संघाचे कार्याध्यक्ष शंकर मोहिते, उपाध्यक्ष संजय कांबळे, जालिंदर सत्रे, विक्रांत कांबळे, नितीन खैरमोडे, प्रविण जाधव, श्रीगणेश गायकवाड आदींसह नॅक समन्वयक डॉ. पी. वाय. फडणीस, सहसमन्वयक डॉ. एम. आर. सपकाळ, डॉ. एस. आर. सुपनेकर, डी. आर. फडतरे, डॉ. एस. एस. तडाखे, डॉ. जी. एस. पट्टेबहादुर, सौ. एच. व्ही. काटे, डॉ. डी. एस. पाटील, जिमखाना उपाध्यक्ष डॉ. बी. व्ही. जाधव, प्रा. ए. टी. सुतार, प्रा. एम. डी. जाधव यांची उपस्थित होते.